# ECHO OF HIS CALL

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE
REACHING NATIONS

**India's National Spiritual Newspaper**

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHAUL BENJAMIN SHINDE

VOL: XXVII | YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, 2025 APRIL | No. 03


### पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

**मार्क १६:९-१६**

९. मग आठवड्याच्या पहिल्या दिवशी पहाटेस तो पुन्हा उठल्यावर, ज्या मरीया मग्दालीयेतून त्याने सात भुते काढून टाकली होती तिला तो पहिल्याने दिसला.

१०. तिने जाऊन जे त्याच्याबरोबर पूर्वी होते, ते शोक करीत व रडत असता, त्यांना हे सांगितले.

११. आणि त्यांनी जेव्हा ऐकले की तो जिवंत आहे व तिच्या पाहण्यात आला, तेव्हाही त्यांनी विश्वास धरला नाही.

१२. आणि या गोष्टी झाल्यानंतर त्यांतील दोघे जण बाहेर गावी चालत जात असता त्यांना तो दुसऱ्या रूपाने प्रकट झाला.

१३. मग त्यांनी जाऊन बाकीच्यांना सांगितले, परंतु त्यांनी त्यांच्यावरही विश्वास ठेवला नाही.

१४. नंतर अकराजण जेवायला बसले असता तो त्यांना प्रकट झाला, आणि त्याने त्यांच्या अविश्वासाविषयी व अंतःकरणाच्या कठीणपणाविषयी त्यांना दोष लावला, कारण तो पुन्हा उठल्यावर ज्यांनी त्याला पाहिले होते त्यांचा त्यांनी विश्वास धरला नव्हता.

१५. आणि तो त्यांना म्हणाला, तुम्ही सगळ्या जगात जाऊन सर्व उत्पत्तीला शुभवर्तमान गाजवा.

१६. जो विश्वास धरतो व बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल, परंतु जो विश्वास धरीत नाही तो दंडास पात्र ठरेल.

## पुनरुत्थानाच्या मागे असलेली आशा!

## THE HOPE BEHIND RESURRECTION!


*सन्माननीय प्रमुख संपादक,*
*रेव्ह. अॅन्जेलाइन सेल्वाकुमारी*




ईस्टर हा एका नव्या आशेचा उत्सव आहे - ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाद्वारे निराशेचे आनंदात रूपांतर होते असा काळ. तरीही, आपल्या धावपळीच्या जीवनात आणि अथक संघर्षांमध्ये, कधीकधी आशा आपल्यापासून दूर आहे असे वाटू शकते. असे काही क्षण येतात जेव्हा आपला विश्वास डळमळीत होतो, जेव्हा आपलं दर्शन अंधुक दिसायला लागतं आणि जेव्हा आपल्याला देवाचा हात काम करीत आहे हे समजून घेण्यासाठी संघर्ष करावा लागतो. जर तुम्हाला कधी अस्थिरतेने ग्रासले असेल तर धीर धरा - तुम्ही एकटे नाही आहात.

लूक २४:१३-३५ मधील अम्माऊसच्या रस्त्यावरील दोन शिष्यांची कथा हे सत्य प्रभावीपणे स्पष्ट करते. हे सत्य आपल्याला आपल्या द्विधा मनःस्थितीच्या क्षणीही येशू आपल्या बरोबर चालत असतो आणि आपला विश्वास पुन्हा जागृत करण्यास आणि आपली आशा पुनर्स्थापित करण्यास तत्पर असतो याची आठवण करून देतं.

### अविश्वासाचे ओझे!

दोन शिष्य धुळीने भरलेल्या रस्त्यावरून चालत आहेत, त्यांची पावले दुःखांनी जड झालेली आहेत व त्यांची अंतःकरणे नैराश्येने भरून गेलेली आहेत असे हे चित्र आहे.

त्यांनी आपल्या सर्व आशा येशूवर ठेवल्या होत्या, कारण त्यांना विश्वास होता की,

(...पान ३ वर)




## एको ऑफ हिज कॉल

*यू ट्युब ख्रिश्चन चॅनल !*

पास्टर सॅम सेल्वा राज यांच्या सोबत प्रार्थनेत
सहभागी होण्याची संधी
*पाच मिनिटांचा संदेश*

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

प्रतिदिनी - पहाटे २.०० वाजल्या पासून
रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

* कृपा करुन सबक्राईब करा *

# ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)

REACHING NATIONS

## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



**कारण हा देव सदासर्वकाळ आमचा देव आहे; तो मरणाच्या पार आमचा वाट दाखवणारा होईल - स्तोत्र ४८:१४.**



### आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.

HON. EDITOR-IN-CHIEF
Rev. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.
EX MANAGING EDITOR
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.
GENERAL MANAGER
Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM, MBA.
ADMINISTRATION
Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)
EDITORIAL BOARD
Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Rev. Dr. K.R. Rajasekaran
Rev. Dr. William Robert, Ph.D., DD, D.Lit.
EDITOR, PUBLISHER & PRINTER
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858 95661 31858
E.MAIL
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
WEBSITES
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.org
YOUTUBE CHANNEL
Echo of His Call

ख्रिस्तातील प्रिय मुलांनो,

आपल्या प्रभु आणि तारणहार येशू ख्रिस्ताच्या मौल्यवान नावाने अभिवादन! ''**तो उत्तम आहे, कारण त्याची प्रेमदया सर्वकाळ आहे.**'' - २ इतिहास ७:३.

१९६९ मध्ये स्थापना झाल्यापासून सेवाकार्याच्या ५५ अद्भुत वर्षांमध्ये आम्हाला देवाच्या विश्वासूपणामुळे मार्गदर्शन लाभले. आमचे व्यवस्थापकीय संपादक आणि आमचा मुलगा पास्टर अॅलेक्स सॅमसन सॅम, जे आमच्यासोबत उभे होते, व आमच्याबरोबर हातात हात घालून काम करीत होते, त्यांनी १३.०२.२०२५ रोजी आपली धाव पूर्ण केली आणि प्रभूच्या उपस्थितीत प्रवेश केला. त्यांच्या जीवनाबद्दल आणि सुमारे ३० वर्षांपासून सेवेमधील त्यांच्या योगदानाबद्दल देवाची स्तुती असो. आपण पुन्हा भेटणार आहोत. आम्हाला तुमच्या प्रार्थनेची गरज आहे.



*बहीण अँजेलिन सेल्वाकुमारी*

**एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीज**चा ५६ वा वर्धापन दिन ८, ९ आणि १० ऑगस्ट रोजी आमच्या संतोषपुरम शाळेच्या मैदानावर साजरा केला जाईल. या सभांमध्ये विशेष वक्ते सेवा प्रदान करतील आणि त्यानिमित्ताने आम्ही तुम्हाला प्रार्थना आणि सहभागीतेमध्ये सामील होण्यासाठी आमंत्रित करतो.

आम्हाला हे जाहीर करताना आनंद होत आहे की, आमची प्रिय कन्या बहीण अँजेलिन सेल्वाकुमारी, माननीय मुख्य संपादक, यांची आमच्या कार्यालयांच्या नवीन प्रमुख आणि कार्यकारिणी म्हणून इतर समर्पित सदस्यांसह नियुक्ती करण्यात आली आहे. आम्ही आमच्या टीम आणि सेवेतील सहभागीदारांना विनंती करतो की, त्यांनी प्रार्थनेत त्यांना उचलून धरावे आणि हे कार्य नव्या उंचीवर नेत असताना त्यांना पूर्णपणे पाठिंबा द्यावा.

## जोशुआ वॉरियर्स इंटरनॅशनल!

गेल्या तीन वर्षांपासून, आमची **जोशुआ वॉरियर्स इंटरनॅशनल** खालील सेवांमध्ये सक्रियपणे गुंतलेली आहे:

### १. युवा आणि बाल संगोपनासाठी जागतिक दृष्टीकोन:

तुमच्या संबंधित देशांमध्ये दररोज रात्री १० वाजता प्रार्थनेची वेळ निश्चित करण्यात आली आहे. आम्ही तुम्हाला प्रार्थना करण्यास प्रोत्साहित करतो:

***हे प्रभु, कृपा करून जगातील सर्व युवा, महिला आणि मुलांची आठवण कर.***

या काळात देव आपल्या मंडळ्यांमधील यु वकांमध्ये सामर्थ्यीपणाने कार्य करीत आहे. तुम्ही या प्रार्थनेच्या टीममध्ये सहभाग करू शकता. तुम्ही जिथे राहता तिथून दररोज रात्री १०.०० वाजता ही प्रार्थना करू शकता. देव तुम्हाला आशीर्वादित करो.

**२. २४ तासांच्या प्रार्थनेची मालिका:**

जागतिक संजीवन आणि लोकांच्या गरजा लक्षात घेऊन, आमच्याकडे दररोज संपूर्ण आठवडाभर प्रार्थनेची एक नियमितपणे मालिका सुरु आहे. तुम्हाला अनुकूल असलेल्या वेळी एक तासाच्या प्रार्थनेच्या कालावधीसाठी तुम्ही नोंदणी करून सहभागी होण्यासाठी आम्ही तुम्हाला आमंत्रित करतो. कृपया तुमचे नाव, मोबाईल नंबर व तुम्हाला असलेली प्रार्थनेची अनुकूल वेळ ही माहिती आमच्या कार्यालयात पाठवा.

**३. चर्चासत्रे, शिबिरे आणि कार्यशाळा:**

जगभरातील तरुण पुरुष आणि महिलांना प्रभु येशू ख्रिस्ताचे साक्षीदार म्हणून उभे करण्यासाठी, सांप्रदायिक अडथळे ओलांडून, आंतरराष्ट्रीय स्तरावर तरुण आणि मुलांसाठी विशेष प्रशिक्षण सत्रे आयोजित केली जातात.



*बहीण अँड्रिया ख्रिसमस हेन्री*

जर तुम्ही या जागतिक प्रार्थना सेवेचा भाग होण्यास इच्छुक असाल, तर तुम्ही मोफत नोंदणी करू शकता, जेणेकरून आम्ही तुम्हाला त्यासंदर्भातील माहिती आणि साक्षी पुरवत राहू. सिस्टर अँड्रिया ख्रिसमस हेन्री यांनी या सेवेची जबाबदारी स्वीकारली आहे.

## सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूल

आम्ही **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूल**साठी सक्षम वडील आणि शिक्षक शोधत आहोत.



*रेव्ह. डॉ. जॉन राजरत्नम*

## नहेम्या बायबल कॉलेज!

याव्यतिरिक्त, आमची नहेम्या बायबल महाविद्यालये प्रभावीपणे कार्यरत आहेत.

(१) **तामिळ वर्ग** - वेलाचेरी, चेपॉक आणि संतोषपुरम (सायंकाळचे वर्ग, आठवड्यातून तीन दिवस - सोमवार, मंगळवार, गुरुवार).

(२) **हिंदी वर्ग** - वेलाचेरी (निवासी वर्ग).

वरिष्ठ प्राचार्य म्हणून या विभागाचे नेतृत्व करणारे रेव्ह. डॉ. जॉन राजरत्नम यांना तुमच्या प्रार्थनेत कायम ठेवा.

## पोचपावती आणि कृतज्ञता!

आमचे समर्पित सहयोगी संपादक, अनुवादक, मदतनीस, कार्यालयीन कर्मचारी, डीटीपी कर्मचारी आणि प्रिंटिंग स्टाफ या सर्वांसाठी आम्ही देवाचे आभार मानतो, ज्यांच्या अथक प्रयत्नांमुळे १६ भाषांमध्ये '**एको ऑफ हिज कॉल**'चे मासिक प्रकाशन होत असते. कृपया या ७५ जणांच्या चमूसाठी प्रार्थनेत आठवण ठेवा.

पाळक वर्ग, संडे स्कुल शिक्षक, प्रार्थना गट नेते, युवा नेते आणि गृह प्रार्थना गट समन्वयक असे १०० हून अधिक सेवक आमच्या मुख्य मंडळीमध्ये आणि त्याच्या शाखीय मंडळ्यांमध्ये विश्वासूपणे सेवा करीत आहेत. या सेवाकार्यासाठी तुमच्या सतत प्रार्थना आणि पाठिंब्याची आम्ही मनापासून अपेक्षा करतो.

आम्ही आपल्या प्रभु येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवतो की, तो त्याच्या लोकांद्वारे प्रत्येक गरज पूर्ण करील व त्याच विश्वासावर आम्ही ठाम उभे आहोत. आम्ही मनुष्याच्या क्षमतेवर अवलंबून नसून देवाच्या तरतुदीवर अवलंबून आहोत. या सेवेसाठी प्रार्थनेत सामील होण्यासाठी आणि जसे प्रभु तुम्हाला सुचविल त्याप्रमाणे या सेवेला सहाय्य करण्यासाठी आम्ही तुम्हाला प्रोत्साहित करतो.

प्रभु परत येईल तेव्हा तो तुम्हाला त्यानुसार प्रतिफळ देईल.

देवाची कृपा तुम्हांबरोबर असो.
त्याच्या सेवेमध्ये,
ख्रिस्त येशूमध्ये तुमचा सेवक,

**एको ऑफ हिज कॉल परिवार.**

E.mail : sam@echoofhiscall.org

★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★

## कृपया इथे लक्ष द्या!

आमचे **एको ऑफ हिज कॉल** यूट्युब चॅनलवर आमचे ५ मिनिटांचे मननपर संदेश दररोज पहाटे २.०० वाजता तामिळ, तेलगू, इंग्रजी आणि हिन्दी या भाषांमध्ये प्रसारीत होत असतात. ते संदेश ऐकून तुम्ही देवाची कृपा प्राप्त करु शकता.

आणखी माझे मोबाईल क्रमांक ९८४१०७१८५८, आणि ९८४१२७१८५८ (वैयक्तिक) तुमच्या मोबाईलमध्ये जतन करुन ठेवा.

**- पास्टर एस्. सॅम सेल्वा राज**

★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★

(पान १ वरुन...)

तोच बहुप्रतिक्षित मशीहा आहे जो इस्राएलची सुटका करील. पण आता, त्याच्या क्रूसावर चढवण्याच्या आठवणी त्यांच्या मनात ताज्या असताना, त्यांची स्वप्ने उद्ध्वस्त झालेली होती. जरी त्याच्या पुनरुत्थानाच्या बातम्या पसरण्यास सुरवात झाली असली, तरी त्यांच्या दुःखामुळे आणि शंकेमुळे त्यांची आकलन शक्ती धूसर झाली होती.

ते प्रवास करीत असताना, एक अनोळखी व्यक्ती त्यांच्यात सामील झाली; जरी त्यांनी त्याला ओळखले नसले तरी तो स्वतः येशू होता. ते करीत असलेल्या चर्चेबद्दल त्याने त्यांना विचारले असता, त्यांनी त्यांचे दुःख आणि त्यांच्या मनातला गोंधळ त्याच्यासमोर मोकळा केला. येशूने त्यांचे धीराने ऐकले, आणि नंतर त्यांना हळूवारपणे फटकारले:

"......**अहो, बुद्धिहीन आणि भविष्यवाद्यांनी सांगितलेल्या सर्व गोष्टींचा विश्वास धरण्यास अंतःकरणाने मंद अशा माणसांनो!**" (लूक २४:२५).

त्याचे शब्द कठोर नव्हते, तर

पवित्र शास्त्रातील अभिवाचनांचे स्मरण करण्यासाठी हळुवारपणे केलेले एक आवाहन होते - त्याच्याकडे निर्देशित करीत असलेली प्रत्येक भविष्यवाणी, प्रत्येक दैवी आश्वासन यांचे स्मरण.

आपण किती वेळा आपल्या स्वतः ला शिष्यांच्या जागी पाहतो? आपल्याला देवाची अभिवचने माहित आहेत, पण तरीही जेव्हा संकटांचा आघात होतो, तेव्हा आपले लक्ष त्याच्या सत्यापासून विचलित होऊन आपल्या संकटांकडे वळते. आपल्या भावना आपल्या विश्वासाला झाकून टाकतात, ज्यामुळे आपण निराश होतो. पण न बदलणारी वास्तविकता तशीच राहते: जरी आपण त्याला ओळखण्यास कमी पडतो, तरी येशू आपल्यासोबत चालत असतो, आपल्या जीवनात स्वतःला प्रकट करण्याची धीराने वाट पाहत असतो.

## येशू, महान सांत्वनकर्ता!

येशूने त्याच्या शिष्यांशी ज्या पद्धतीने संपर्क साधला, त्यामुळे अम्माऊसचा हा प्रसंग इतका हृदयस्पर्शी बनला. तो त्याची ओळख बडेजावपणे किंवा जाहीर प्रदर्शन करून लगेच करून देत नाही. त्याउलट, तो त्यांच्याबरोबर चालतो, त्यांचे दुःख ऐकतो आणि सौम्यपणे त्यांना समजण्यास मदत करतो. असे करून, तो आपल्या संघर्षांबद्दलची त्याची सखोल जाणीव प्रदर्शित करतो. आपल्या दुःखाच्या आणि निराशेच्या क्षणांमध्ये येशू आपल्याला भेटतो. तो तात्काळ विश्वासाची मागणी करीत नाही किंवा आपल्या वेदना एका रात्रीत नाहीशा होतील अशी अपेक्षा करीत नाही. उलट, तो त्याची प्रेमळ उपस्थिती आणि सत्यता यांद्वारे निरोगी करण्याचे सामर्थ्य देतो.

ज्या वेळी तुम्हाला निराश झाल्यासारखे वाटले त्या वेळेचा विचार करा, म्हणजे कदाचित तुमचे नाते-संबंध बिघडल्यानंतर, नोकरी गेल्यानंतर किंवा भयंकर अशा अपयशानंतर. त्या क्षणी, तुम्हाला वाटले असेल की देव शांत का आहे? तरीही, सत्य हे आहे की, तो नेहमीच तुमच्याबरोबर होता, तुमच्यासोबत चालत होता, त्याच्या वचनातून बोलत होता आणि तुम्ही त्याला ओळखण्याची धीराने वाट पाहत होता. येशू आपल्याला आपले ओझे त्याच्या उपस्थितीमध्ये आणण्याचे आमंत्रण देतो, जेणेकरून तो आपल्या निराशेचे आशेत रूपांतर करू शकेल. योहान ११:२५ घोषित करते की, **"पुनरुत्थान व जीवन मीच आहे; माझ्यावर विश्वास ठेवतो तो मेला तरी जगेल."** हे अभिवचन केवळ दूरस्थ असलेल्या भविष्यासाठी नाही, तर आपण दररोज ज्या आव्हानांना तोंड देतो त्यांच्यासाठी आहे.

## देवाच्या वचनाचे सामर्थ्य!

शिष्य त्यांचा प्रवास सुरू ठेवत असताना, येशूने त्यांच्यासमोर शास्त्रवचनांचा उलगडा करण्यास सुरुवात केली. त्याने हे प्रगट केले की, मोशेपासून ते स्तोत्रसंहितेमधील प्रत्येक भविष्यवाणी त्याच्या दुःखाकडे आणि अंतिम वैभवाकडे कशी निर्देशित करतात. त्या संभाषणाच्या गंभीरतेची कल्पना करा: प्रत्येक शब्द, प्रत्येक भविष्यवाणी, प्रत्येक पूर्वसूचना अचानक जिवंत झाली. शिष्यांनी नंतर वरील जे उद्गार काढले यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही, **"..... तो वाटेत आम्हांशी बोलत होता व आम्हांला शास्त्रलेखाचा उलगडा करून सांगत होता, तेव्हा आमचे अंतःकरण आत उकळत नव्हते काय?"** (लूक २४:३२).

## सजीव वचन आणि पुनरुत्थानाचे अभिवचन!

पवित्र शास्त्र हे भूतकाळातील अवशेष नसून ते एक जिवंत, क्रियाशील मार्गदर्शक आहे (इब्री ४:१२), जे आजही आपल्या हृदयाशी संभाषण करते. जेव्हा आपण पवित्र शास्त्रात स्वतःला हरवून घेतो, तेव्हा आपल्या शांतीला धोका निर्माण करणाऱ्या शंका आणि निराशेला निष्क्रिय करण्यासाठी देवाच्या सत्यतेला आमंत्रित करतो. शिष्यांना येशूच्या उपस्थितीचा शारीरिक पुरावा आवश्यक नव्हता, मात्र त्यांना त्याच्या वचनाचे आकलन झाल्यानंतर मिळणाऱ्या प्रकटीकरणाची आवश्यकता होती. आणि जेव्हा त्या प्रकटीकरणाने त्यांच्या निराशेला छेद दिला तेव्हा त्यांच्या हृदयात नव्या आशेची ज्योत पेटली.

रोम ६:४ हे वचन आपण लक्षात घेऊया जे जाहीर करते कि, **"आपण बाप्तिस्म्याकडून त्याच्याबरोबर मरणात पुरले गेलो, अशासाठी की, जसा ख्रिस्त बापाच्या महिम्याने मेलेल्यांमधून उठवला गेला तसे आपणही जीवनाच्या नवीनपणात चालावे."** हे नवीन जीवन पुनरुत्थानाच्या आशेच्या पायावर बांधले गेले आहे, जी आशा आपल्या अंतर्मनात बदल घडवते आणि अगदी कठीण काळात सुद्धा आपल्या आत्म्याला संजीवित करते.

## पुनरुत्थानाचे अभिवचन!

पुनरुत्थान ही केवळ ईस्टर सकाळपुरती मर्यादित असलेली ऐतिहासिक घटना नाही; ती आपल्या विश्वासाचा आधारस्तंभ आहे आणि पाप आणि मृत्यूवरील देवाच्या सामर्थ्याचे अंतिम प्रदर्शन आहे. १ करिंथ १५: २०-२२ मध्ये पौल घोषणा करतो की, **"तर आता ख्रिस्त मेलेल्यांमधून उठवला गेला आहे, तो निजलेल्यांतले प्रथम फळ असा आहे. कारण मनुष्याकडून मरण आले म्हणून मनुष्याकडून मेलेल्यांचे पुनरुत्थानही आले आहे. कारण जसे आदामात सर्व मरतात तसेच ख्रिस्तात सर्व जिवंत केले जातील."** हे गहन सत्य आपल्याला खात्री देते की, मृत्यू हा शेवट नाही, आणि तसेच आपल्या परीक्षा किंवा अपयशही नाहीत.

येशूचा मृत्यूवरील विजय आपल्याला हमी देतो की, आपणही आपल्या परिस्थितींपासून उभारी घेऊ शकतो. जेव्हा जीवनातील अडचणी आपल्याला व्यापून टाकतात, तेव्हा पुनरुत्थान दृष्टिकोनात बदल घडवून आणतो: आपले सध्याचे दुःख तात्पुरते आहे, परंतु शाश्वत जीवनाची आशा अढळ आहे. आपल्याला केलेले पाचारण हे आपल्या दुःखांना फेटाळून लावण्याकरिता नाही तर ख्रिस्ताच्या

(...पान ६ वर)

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

स्तुती आणि प्रार्थनेचे विषय - १९ एप्रिल, २०२५ पासून ते १८ मे, २०२५

**(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)**

## याकरीता देवाची स्तुती करा...

एप्रिल १९ - **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूल** आणि **नहेम्या बायबल कॉलेज**च्या सर्व उपक्रमांमधील देवाच्या मार्गदर्शनामुळे देवाची स्तुती असो.

एप्रिल २० - आमच्या संस्थेसाठी पात्र आणि समर्पित नव्या उमेदवारांची नियुक्ती करण्यास देवाने आम्हांस आशीर्वादित केले म्हणून देवाची स्तुती असो.

एप्रिल २१ - आमच्या सर्व सहाय्यक संपादकांचे जीवन आणि कुटुंबिय यांच्याबद्दल देवाची स्तुती असो.

एप्रिल २२ - आमचे चर्च, संडे स्कूल, युवकांमधील सेवा आणि रुग्णालयातील भेटी देण्याच्या कार्यक्रमांना देवाने सतत आशीर्वादित केल्यामुळे देवाची स्तुती असो.

एप्रिल २३ - आमचे वरिष्ठ पाळक एस. सॅम सेल्व राज आणि त्यांच्या कुटुंबियांना दुष्ट शक्तींपासून सुरक्षित ठेवल्याबद्दल देवाची स्तुती असो.

एप्रिल २४ - **बायबल कॉरस्पॉन्डन्स कोर्सेस (बायबलकोर)** आणि **थिऑलॉजिकल कॉरस्पॉन्डन्स कोर्सेस** यांच्यावर असलेल्या देवाच्या कृपेबद्दल देवाची स्तुती असो.

एप्रिल २५ - आमच्या संस्थेच्या कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना आशीर्वाद दिल्याबद्दल, तसेच त्यांचे हित आणि संरक्षण सुनिश्चित केल्याबद्दल देवाची स्तुती असो.

एप्रिल २६ - आमचे वरिष्ठ पाळक एस. सॅम सेल्व राज यांच्या पाच मिनिटांच्या युट्युब संदेशांमधून समोर येणाऱ्या अद्भुत साक्षींबद्दल देवाची स्तुती असो.

एप्रिल २७ - २०२४-२०२५ या आर्थिक वर्षासाठी देवाने केलेल्या तरतुदी आणि मार्गदर्शनाबद्दल देवाची स्तुती असो.

एप्रिल २८ - आमच्या प्रिंटिंग प्रेसमध्ये १६ भाषांमध्ये छापलेल्या आणि मिशन क्षेत्रात वितरित केलेल्या आमच्या प्रकाशनांना देवाने केलेल्या विपुल आशिर्वादाबद्दल देवाची स्तुती असो.

एप्रिल २९ - आमच्या प्रार्थना सहभागीदारांवर, सदस्यत्व घेणाऱ्या सहभागीदारांवर, विश्वासातील सहभागीदारांवर, आयुष्यभर सोबत करणाऱ्या सहभागीदारांवर आणि महान सेवाकार्याच्या सहभागीदारांवर आणि त्यांच्या कुटुंबियांवर असलेल्या देवाच्या दयेबद्दल देवाची स्तुती असो.

एप्रिल ३० - आमच्या सर्व चर्च कार्यक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी होण्यासाठी तरुणांना प्रेरणा आणि बळकटी दिल्याबद्दल देवाची स्तुती असो.

मे ०१ - आमच्या सेवा करणाऱ्या सेवकांच्या अढळ वचनबद्धतेबद्दल देवाची स्तुती असो.

मे ०२ - जागतिक अशांतता आणि युद्धाच्या धोक्याच्या काळात सर्व राष्ट्रांच्या दैवी संरक्षणाबद्दल देवाची स्तुती असो.

मे ०३ - राजकीय आणि धार्मिक विरोध असूनही आपल्या ख्रिस्ती सेवाकार्याच्या क्षमतेबद्दल देवाची स्तुती असो.

## कृपया यासाठी प्रार्थना करा...

मे ०४ - २०२५-२६ शैक्षणिक वर्षासाठी आमच्या निवासी आणि संध्याकाळच्या नहेम्या बायबल कॉलेजमध्ये पात्र विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी प्रार्थना करा.

मे ०५ - २०२५-२६ शैक्षणिक वर्षासाठी **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूल**मध्ये नवीन विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी प्रार्थना करा.

मे ०६ - जगभरातील चर्च आत्मे जिंकण्यासाठी आणि संजीवन अनुभवण्यासाठी प्रार्थना करा.

मे ०७ - आमच्या गॉस्पेल प्रिंटिंग प्रेसचे कामकाज आणि त्याचे दैनंदिन कार्य सुरळीत चालण्यासाठी प्रार्थना करा.

मे ०८ - आमच्या संस्थेच्या सर्व कर्मचाऱ्यांमध्ये एकता आणि सुसंवाद असावा यासाठी प्रार्थना करा.

मे ०९ - आमच्या सहाय्यक संपादकांवर आणि त्यांच्या कुटुंबियांवर देवाचे आशीर्वाद असावेत म्हणून त्यांच्यासाठी प्रार्थना करा.

मे १० - आपल्या सेवाकार्याच्या आर्थिक गरजा पूर्ण होण्यासाठी लागणाऱ्या पुरवठ्यांसाठी प्रार्थना करा.

मे ११ - देवाचे सेवक आणि मिशनरी यांच्या छळाचा शेवट होण्यासाठी प्रार्थना करा.

मे १२ - उत्तर भारतातील मिशनरी आणि देवाच्या सेवकांना त्यांच्या कुटुंबियांसह चांगले आरोग्य आणि सामर्थ्य मिळावे म्हणून प्रार्थना करा.

मे १३ - जगावर परिणाम करणाऱ्या तीव्र हवामान परिस्थितीपासून देवाने संरक्षण करावे म्हणून प्रार्थना करा.

मे १४ - निस्वार्थपणे आपल्या मुलांचे संगोपन आणि वाढ करणाऱ्या मातांसाठी प्रार्थना करा.

मे १५ - जगभरातील रुग्ण जे जीवघेण्या आजारांनी ग्रस्त आहेत ते दीर्घकाळ रुग्णालयात राहतात त्यांच्यासाठी प्रार्थना करा.

मे १६ - पृथ्वीवर त्याचे राज्य पुढे नेण्यासाठी नव्या दृष्टिकोन आणि मार्गदर्शनासाठी प्रार्थना करा.

मे १७ - न पोहोचलेल्या प्रदेशांमध्ये धैर्याने सुवार्ता सांगण्यासाठी आणि संधी मिळण्यासाठी प्रार्थना करा.

मे १८ - विविध क्षमता असलेल्या आपल्या सेवाकार्याची वाढ आणि प्रसार करण्यासाठी प्रार्थना करा..

(पान ४ वरुन)

विजयाच्या चष्म्यातून ते पाहण्याचे आमंत्रण आहे. त्याच्यामध्ये आपण टिकून राहावे म्हणून आपल्याला सहन करण्याची शक्ती, आशा बाळगण्याचे धैर्य आणि आपण जे पाहू शकतो त्याच्या पलीकडे असलेल्या भविष्याचे आश्वासन मिळते.

## परीक्षांच्या मध्यभागी आशा!

पुनरुत्थानातून मिळणाऱ्या आशेच्या प्रकाशात जगण्याचा अर्थ असा नाही की, जीवन आव्हानांपासून मुक्त असेल. रोम ८:१८ मध्ये पौल आपल्याला आठवण करून देतो की, **"मी असे मानतो की, आमच्यासाठी जे गौरव प्रकट होणार आहे त्यापुढे या आत्ताच्या काळाची दुःखे ही काहीच नाहीत."** आपल्या परीक्षा कितीही वेदनादायक असल्या तरी, आपल्याला दिलेल्या सार्वकालिक गौरवाच्या प्रकाशात त्या तात्पुरत्या आहेत.

खरं तर, आपला संघर्ष जणू माती म्हणून उपयोगाला येते, ज्यामध्ये आपल्या विश्वासाचे मूळ धरून त्याची वाढ होते. याकोब १:२-४ मध्ये आपल्याला प्रोत्साहित करतो की, **"माझ्या भावांनो, तुम्ही नाना प्रकारच्या परीक्षांत असता तेव्हा ते सगळे आनंद माना; कारण तुम्हांस ठाऊक आहे की, तुमच्या विश्वासाची परीक्षा ही सहनशीलता निर्माण करते."** जेव्हा आपण पुनरुत्थानापासून मिळणाऱ्या खात्रीपूर्वक आशेसह कठीण परिस्थिती सहन करतो, तेव्हा आपल्याला आपल्या आंतरिक सामर्थ्याची ओळख होते, जी आपल्याला कधीच माहित नव्हती.

## आशेच्या पुनर्स्थापनेची खरी जीवन कहाणी!

प्रचंड नुकसानीमध्ये सुद्धा ज्यांची आशा पुनर्स्थापित झाली असे त्यांना दिसून आले अशा व्यक्तींच्या वृत्तांतांनी इतिहास भरलेला आहे. अशीच एक कहाणी होराशियो स्पॅफोर्डची आहे, ज्याने अकल्पनीय दुःख सहन केले. १८७३ मध्ये, एका दुःखद जहाज दुर्घटनेत त्याने आपल्या चार मुली गमावल्या. त्याच्या दुःखाची गंभीरता शब्दातीत होती. तरीसुद्धा, निराशेमध्ये असतांना सुद्धा, ख्रिस्तामध्ये असलेल्या आशेला तो चिकटून राहिला.

आपल्या शोकाकुल पत्नीला भेटण्यासाठी तो जहाजाने जात असताना, स्पॅफोर्ड त्याच्या मुली जिथे बुडाल्या होत्या त्या ठिकाणाहून गेला. त्या ठिकाणाहून जात असता, दुःखामध्ये त्याने एक स्तोत्रगीत लिहिले, ज्याचे शब्द होते, इट इज वेल विथ माय सोल.

प्रचंड नुकसानीबद्दल स्पॅफोर्डची प्रतिक्रिया अम्माऊस शिष्यांच्या प्रवासाचे प्रतिबिंब आहे. त्याचे हृदय भग्न झालेले असले तरी त्याचा विश्वास अढळ राहिला. त्याला हे समजले होते की, दुःख अपरिहार्य असले तरी, निराशा हा शेवटचा शब्द असू शकत नाही. ज्याप्रमाणे शिष्यांनी भाकर मोडताना येशूला ओळखले, त्याचप्रमाणे स्पॅफोर्डने त्याच्या सर्वात अंधकारमय क्षणांमध्येही पुनरुत्थित ख्रिस्ताच्या उपस्थितीतून मिळणारी शांती आणि पुनर्स्थापित आशा अनुभवली.

## त्याच्या विजयाच्या प्रकाशात जगणे!

पुनरुत्थान हे मृत्यूवरील विजयापेक्षा अधिक आहे; हे आपले जीवन पुन्हा मिळविण्याचे दिलेले निमंत्रण आहे. रोम ८:३७ याची घोषणा करते की, **"तथापि ज्याने आपणांवर प्रीती केली त्याच्याद्वारे या सर्व गोष्टींमध्ये आपण अत्यंत विजयी आहो."** ही पुनरुत्थानाच्या आशेची परिवर्तनकारी शक्ती आहे. ते आपल्याला जीवनातील आव्हानांना तोंड देण्यास बळ देते, आपल्याला आठवण करून देते की, आपण आपल्या संघर्षांनी नव्हे तर ख्रिस्ताच्या प्रेमाने आणि विजयाने ठरविले गेलो आहोत.

या प्रकाशात जगणे म्हणजे प्रत्येक परीक्षेचा एक उद्देश असतो आणि प्रत्येक दुःखाची भरपाई होऊ शकते यावर विश्वास ठेवणे. ते आपल्याला धैर्याने चालण्यास, कृपेचा विस्तार करण्यास आणि येशूला मृतांमधून उठवणारे तेच सामर्थ्य आपल्यामध्ये वास करते हे सत्य स्वीकारण्यास आवाहन करते. याचा अर्थ असा आहे की, आशा लगेचच भंग पावणारी जरी असली, तरी ती पुनर्स्थापित आणि पुनरुज्जीवित होऊ शकते, अशी जिवंत साक्ष आपल्या जीवनामध्ये निर्माण होण्यास मदत करते.

## नव्या आशेसाठी आवाहन!

अम्माऊसच्या प्रसंगाचे महत्त्व ऐतिहासिक वृत्तांत असण्यापेक्षाही जास्त आहे - तो आपल्या प्रत्येकासाठी एक वैयक्तिक आमंत्रण आहे. संशय आणि निराशेच्या क्षणीही येशू आपल्यासोबत चालतो याची हा प्रसंग आठवण करून देतो. त्याची सौम्य उपस्थिती आपल्याला


नहेम्या बायबल कॉलेजेस
चेपॉक आणि संतोषपुरम, वेलाचेरी, चेन्नाई
शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक
प्रवेशा करिता त्वरा करा ! माध्यम : तमिळ (अर्धवेळ)
हिंदी (निवासी) (स्पोन्सरशिप उपलब्ध)
ईश्वरविद्या डिप्लोमा
संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org
✲ ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे ✲
आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ठ पाळकांद्वारे ५५ वर्षांपासून मान्यता प्राप्त
ECHO OF HIS CALL REACHING NATIONS

खात्री देते की, क्रूस हा शेवट नव्हता आणि तसेच आपला सध्याचा संघर्षही शेवट नाही आहे.

### तर मी तुम्हाला विचारतो:

आज तुमच्यावर कोणते ओझे आहे? तुमच्या संघर्षांमध्ये तुम्ही येशूला तुमच्यासोबत चालण्यासाठी आमंत्रित केले आहे का?

तुमच्या भावनांच्या अनुसार तुम्ही तुमच्या विश्वासाला आकार देऊ इच्छिता कि देवाच्या वचनातील अपरिवर्तनीय सत्यावर तुम्ही ठाम आहात?

या ईस्टरला, तुम्ही शंकांकडून विश्वासाकडे, निराशेकडून आशेकडे जाण्याचा निर्णय घ्याल का?

जर प्रकाशाचा अनुभव घेण्यासाठी तुमचा संघर्ष होत असेल, तर मग आता थोडा वेळ प्रार्थनेमध्ये घालवा. जसा येशू शिष्यांच्या संघर्षामध्ये चालला तसाच तो तुमच्या संघर्षामध्ये तुमच्याबरोबर चालावा म्हणून त्याला आमंत्रित करा. तुमचे पवित्र शास्त्र उघडा आणि योहान ११:२५-२६ आणि १ करिंथ १५:२०-२२ या उताऱ्यांवर मनन करा. तो पुनरुत्थान व जीवन आहे ह्या वचनांच्याद्वारे तुम्ही आश्वासित होवो. तुमचे दुःख कितीही भयंकर असले तरी, त्याचा आनंद हा सदैव आहे आणि त्याचे प्रेम अविरत आहे.

### पुनरुत्थानाद्वारे रूपांतरित जीवन म्हणून आत्मसात करणे!

पुनरुत्थानाच्या आशेने जगणे म्हणजे केवळ भविष्यातील आश्वासनावर विश्वास ठेवणे इतकेच नाही, तर त्या आशेला तुमच्या दैनंदिन जीवनाला आकार देण्यास आणि परिवर्तन करण्यास अनुमती देणे आहे. याचा अर्थ असा आहे की, पुढचा मार्ग अंधुक दिसत असतानाही विश्वासाने बाहेर पडणे, खोल जखमा असतानाही क्षमा करणे आणि अशक्य वाटत असतानाही प्रेम करणे. रोम १२:२ मध्ये पौल आपल्याला आठवण करून देतो की, **''या जगाशी समरूप होऊ नका, तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वतः चे रूपांतर होऊ द्या.''** या नवीकरणाची सुरुवात होते, जेव्हा आपण हे ओळखतो की, ज्या सामर्थ्याने येशूला मेलेल्यातून उठवले तेच सामर्थ्य आपल्यामध्ये कार्यरत आहे, जसे ते आपल्या हृदयाचे परिवर्तन घडवते, आपल्या आत्म्याला सबळ करते, आणि जीवनाबद्दलचा आपला दृष्टिकोन पुन्हा स्पष्ट करते.

जर तुम्हाला खरोखरच असे वाटत असेल की, प्रत्येक संघर्ष हा तात्पुरता आहे, प्रत्येक अपयश प्रगतीची संधी आहे आणि प्रत्येक अश्रू हा सार्वकालिक आनंदाकडे घेऊन जाणारा एक पायरीचा दगड आहे, तर तुम्ही आव्हानांना किती वेगळ्या पद्धतीने तोंड देऊ शकाल याची कल्पना करा. हे पुनरुत्थानाच्या आशेद्वारे मिळणारे सामर्थ्य आहे; ते आपल्याला अशा धैर्याने भरून टाकते, जे केवळ ख्रिस्ताला जाणून घेतल्यानेच मिळते.

### पुनरुत्थानाची आशा साकारण्यासाठी ठोस पावले!

आपण ईस्टर आणि नवीन जीवनाच्या अभिवचनाचा आनंद घेत असताना, तुमच्या दैनंदिन जीवनात पुनरुत्थानाची आशा जोपासण्याचे काही मार्ग येथे आहेत:

### १. स्वतः पवित्र वचनामध्ये मग्न व्हा!

देवाचे वचन वाचण्यासाठी आणि त्यावर मनन करण्यासाठी दररोज समर्पित वेळ बाजूला काढा. रोम ६:४, योहान ११:२५-२६ आणि १ पेत्र १:३ या वचनांच्याद्वारे त्याच्या अभिवचनांमध्ये तुमच्या आत्म्याला बळकट होऊ द्या.

....Contd. on page 9


## VERY URGENT NOTICE!




There may be some unavoidable difficulty in dispatching **Echo of His Call** by post in the very near future. Therefore, if you are really interested to receive **Echo of His Call** continuously, please send us your names, addresses, E.mail addresses and WhatsApp numbers through letters, E.mails, phone calls, WhatsApp or SMS messages immediately.

Please help us to serve you continuously.

**Our address:**

**ECHO OF HIS CALL,**
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai-600 005, India
Cell: (+91) 98412 71858 / 98410 71858
E.mail: sam@echoofhiscall.org

## URGENT NEED
**Teachers for**
**ST. PAUL'S MATRICULATION SCHOOL,**
**An *Echo of His Call* Institution**
**Vijayanagaram, Medavakkam, Chennai - 100.**

We need well qualified, experienced, dedicated, hard working and mission oriented Christians.
Apply with Bio-data to
E.mail: sam@echoofhiscall.org
WhatsApp: (+91) 98412 71858

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर ''**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**'' च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | |
|---|---|
| **Account Name** | **: ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | **: 1023 2923 805** |
| **Bank Name** | **: STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | **: TRIPLICANE, CHENNAI - 600 005** |
| **IFSC Code** | **: SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | **: SBI NIN BB 455** |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)

(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)

**''तो रान पाण्याचे तळे करतो, आणि शुष्क भूमी पाण्याचे झरे करतो'' - स्तोत्रसंहिता १०७:३५.**

१९८९ मध्ये, आम्ही एका भाड्याच्या घरात राहत होतो आणि तिथे आम्ही रविवारची उपासना चालवीत होतो. याव्यतिरिक्त, आमचे प्रार्थना आणि मार्गदर्शनपर केंद्र सी.एन.के. रोडवरील भाड्याच्या इमारतीतून चालवले जात असे. तथापि, दोन्ही घरमालकांनी अनपेक्षितपणे आम्हाला त्यांचे घर ताबडतोब रिकामे करण्याचे आदेश दिले.

त्यावेळी मी आणि माझी पत्नी सरकारी अधिकारी होतो. आमची नोकरी स्थिर असूनही, आमच्याकडे पुरेसे आर्थिक संसाधने आणि मानवी पाठबळ नव्हते, कारण आमचे बहुतेक उत्पन्न प्रभूच्या विविध सेवकांना समर्पित होते. आमचे घर, चर्च आणि **इको ऑफ हिज कॉल**चे कार्यालय दुसऱ्या इमारतीत हलवण्यासाठी आमच्याकडे निधी नव्हता. शिवाय, घर मालकांबरोबर आमच्या वतीने मध्यस्थी करणारा कोणी नव्हता. या कठीण परिस्थितीत आमच्यासोबत आमच्या दोन लहान मुलांनाही त्रास सहन करावा लागला.

एकदा सकाळच्या वेळी, या संकटावर उपाय शोधण्याच्या आशेने, आमच्या घरासाठी, चर्चसाठी आणि ऑफिससाठी नवीन जागेच्या शोधात चेपॉकच्या रस्त्यांवर जवळजवळ दोन तास पायीच भटकत राहिलो. प्रत्येक पावलागणिक मी देवाची स्तुती केली, त्याच्या तरतूदीवर विश्वास ठेवला.

शोध कार्य सुरु असतांना, मला दोन घरांचे एजंट भेटले आणि त्यांना आमची तातडीची गरज सांगितली. त्यांनी स्पष्टपणे उत्तर दिले: या भागात कोणीही तुम्हाला भाड्याने जागा देणार नाही. तुम्ही मोठ्याने प्रार्थना करता, 'हालेलुया' असे ओरडता आणि रात्री वाद्ये वाजवून गाणी गाता. यामुळे आमचे देवी-देवता क्रोधीत होतात आणि त्यांची शक्ती कमकुवत होते. परिणामी, आम्हाला त्रास होतो.

मी संयम बाळगून, आशेने, न डगमगता चालत राहिलो. त्यानंतर, मी एका रोमन कॅथोलिक बंधूला भेटलो आणि त्याला माझी परिस्थिती सांगितली. ते ऐकून तो म्हणाला, भाऊ, एक जुने घर रिकामे आहे. पण, तिथे कोणीही राहण्यास तयार नाही कारण त्यांना वाटते की ते भुताने झपाटलेले आहे. पूर्वी त्या घरात राहणाऱ्या एकाने आत्महत्या केली होती आणि त्यावरून तिथे दुष्ट आत्मे राहतात अशी भीती लोकांमध्ये पसरली. पण तुम्ही पवित्र आत्म्याने भरलेले असल्याने आणि अशा आत्म्यांना घालवण्याची शक्ती तुमच्यामध्ये असल्याने तुम्हाला ते घर खूप कमी भाडे तत्वावर मिळेल.

त्याचे शब्द ऐकून मला आनंद झाला आणि माझी आशा पल्लवित झाली. मात्र, एक मोठी अडचण होती - भाड्याचे आगाऊ पैसे देण्यासाठी माझ्याकडे पन्नास रुपयेही नव्हते.

मी घरी परतलो, गुडघे टेकले आणि आपल्या स्वर्गीय पित्याला कळकळीने प्रार्थना केली. देवाने अविश्वसनीय पद्धतीने एक महान चमत्कार केला.

दुसऱ्याच दिवशी, मला दैनिक वर्तमानपत्रात एक जाहिरात दिसली, ज्यामध्ये असे लिहिले होते: ***गृहनिर्माण विकास वित्तीय महामंडळाने*** सरकारच्या सहकार्याने, कायमस्वरूपी सरकारी अधिकाऱ्यांना त्यांच्या स्वतःच्या घरांच्या खरेदीसाठी आगाऊ रक्कम देण्याची योजना सुरू केली आहे. प्रथम येणाऱ्यास प्रथम सेवा या तत्त्वावर मदत दिली जाईल.

संकोच न करता मी माझ्या कार्यालयात गेलो आणि त्वरित अर्ज केला. सामान्यतः अशा आगाऊ रक्कम मंजूर होण्यास सुमारे पाच वर्षे लागत असे. तथापि, देवाच्या कृपेने, मला आवश्यक असलेली रक्कम खूपच कमी वेळात मिळाली. मला निधी मिळताच ती योजना मागे घेण्यात आली याचे मला आश्चर्य वाटले.

त्या रकमेतून आम्ही त्या जुन्या घराबरोबर एक जमीन खरेदी केली, जे आमचे नवीन निवासस्थान बनले. आम्ही आमचे घर, चर्च आणि कार्यालय त्या इमारतीत हलवले. आमच्या भीतीच्या उलट, आम्हाला कोणत्याही दुष्टात्म्याच्या उपस्थितीची चिन्हे दिसली नाहीत. देवाने आम्हाला एका अद्भुत पद्धतीने पुरवले - आमचे चर्च तळमजल्यावर, आमचे निवासस्थान पहिल्या मजल्यावर आणि आमचे कार्यालय दुसऱ्या मजल्यावर होते.

काही वर्षांनंतर, जुनी इमारत पाडून नवीन इमारत बांधण्यास देवाने आम्हाला शक्य केले. आज आमची प्रिंटिंग प्रेस, चर्च, कार्यालय आणि निवासस्थान हे सर्व या नवीन इमारतीमध्ये वसलेले आहे.

१९९४ मध्ये जेव्हा मी सरकारी सेवेतून निवृत्त झालो तेव्हा देवाने कोणतीही थकबाकी राहू न देता संपूर्ण रक्कम परत करण्यास मला मदत केली. आता, मी आनंदाने प्रभूची सेवा करतो.

''**अहो, यहोवा चांगला आहे, याचा अनुभव घेऊन पाहा**'' - स्तोत्र ३४:८.

************

(पान ६ वरुन)

## २. प्रार्थनेसाठी कटिबद्ध व्हा!

देवाशी प्रामाणिक, मनापासून संवाद साधा. तुमचे ओझे त्याच्यासमोर ठेवा आणि तुम्ही कधीही एकटे नाही याची खात्री देणारा त्याचा आवाज ऐका.

## ३. विश्वासणाऱ्यांच्या समुदायात सामील व्हा!

तुमचा एक विश्वास आणि एक आशा असणाऱ्या लोकांच्या नेहमी सान्निध्यात असा. सहभागितेमुळे तुमचा आत्मा बळकट होतो आणि तुमच्या जीवनात देवाच्या परिवर्तन घडवणाऱ्या कार्याच्या साक्षीची एकमेकांबरोबर देवाणघेवाण करताना तुमचा विश्वास अधिक दृढ होतो.

## ४. तुमचा विश्वास प्रदर्शित करा!

पुनरुत्थानाच्या आशेमुळे तुमच्या दैनंदिन कार्यांना उभारी मिळावी. जसे, क्षमा करणे, गरजवंतावर दया करणे किंवा दोलायमान स्थितीतही विश्वासाने बाहेर पडणे, तसेच तुमचे जीवन ख्रिस्ताने त्याच्या सामर्थ्यानिशी तुमची सुटका केली त्याची साक्ष असावी.

## प्रोत्साहनपर शेवट :

या ईस्टरला, तुम्हाला एक गहन परिवर्तन अनुभवायला मिळो – दुःखातून आनंदात, संशयातून अढळ विश्वासात आणि निराशेतून कधीही न संपणाऱ्या आशेत. येशूचे पुनरुत्थान ही केवळ एक ऐतिहासिक घटना नाही; ती आपल्या विश्वासाचा पाया आहे; रात्र कितीही गडद असली तरी, त्याच्या प्रकाशाची पहाट कायमची चमकत राहील अशी ही एक घोषणा आहे.

अध्ययनाच्या या वेळेतून बाहेर पडताना, तुमच्या प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यावर येशू तुमच्यासोबत चालतो ही खात्री तुम्ही बाळगा. तो तुमचे ओझे त्याच्यावर सोपविण्यास आणि त्याच्या प्रेमाने आणि विजयाने नवीकरण झालेल्या जीवनाला स्वीकारण्यास तुम्हाला आमंत्रित करतो. तुमचे हृदय त्याच्या वचनाच्या सामर्थ्यासाठी खुले राहो आणि प्रतिदिनच्या संघर्षाला आत्मविश्वासाने सामना करण्याचे तुम्हाला सामर्थ्य प्राप्त होवो, कारण तुम्ही त्याच्याद्वारे एका विजेत्यापेक्षाही अधिक आहात हे जाणून घ्या.

२ करिंथ ५:१७ चे शब्द तुमच्या अंतर्मनात प्रतिध्वनित होऊ द्या: **"यास्तव जर कोणी ख्रिस्तामध्ये आहे तर तो नवी उत्पत्ती आहे; जुने ते होऊन गेले, पाहा, ते नवे झाले आहे."**

ईस्टरने दिलेल्या या नवीन जीवनाचा स्वीकार करा. पुनरुत्थानाची आशा तुमच्या विचारांना उजळवू द्या, तुमच्या कृतींना प्रेरणा मिळू द्या आणि तुमच्या आयुष्याचे दिवस चिरकाल आनंदाने भरून जाऊ द्या, जो फक्त ख्रिस्तच देऊ शकतो.

जीवनाच्या कोणत्याही मोसमात तुम्ही जरी असाल, तरी येशू तुमच्या जवळ आहे हे जाणून घ्या. तुमचे हृदय उघडा, त्याच्या वचनांवर विश्वास ठेवा आणि त्याने तुमच्यासाठी तयार केलेल्या नवीन जीवनात धैर्याने पाऊल टाका. पुनरुत्थानाच्या सामर्थ्यावर आधारित हा आशेचा संदेश तुमच्या सर्वात अंधाऱ्या क्षणांमध्ये प्रकाशाचा किरण बनो. **आमेन!**

************

# श्रद्धांजली


पास्टर ॲलेक्स सॅमसन सॅम

माझा परम मित्र, पास्टर सॅम सेल्वा राज यांचा एकुलता एक मुलगा, पास्टर ॲलेक्स सॅमसन सॅम, हे १३ फेब्रुवारी २०२५ रोजी स्वर्गवासी झाले. ते आता आपल्यात नसले तरी त्यांचा वारसा आपल्या हृदयात कायम आहे.

आम्ही बंधू सॅम सेल्वा राज, त्यांचे कुटुंब आणि **एको ऑफ हिज कॉल** या सेवेच्या संपूर्ण कर्मचाऱ्यांना आमच्या मनापासून संवेदना व्यक्त करतो.

पास्टर ॲलेक्स सॅमसन सॅम हे स्वभावाने प्रेमळ, आदरणीय आणि दृढनिश्चयी स्वभावाचे होते. त्यांचा प्रेमळपणा आणि अढळ विश्वासाने असंख्य तरुण त्यांच्या प्रभावी कार्यामुळे एका साक्षीच्या रूपात उभ्या असणाऱ्या **एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीज** आणि **जोशुआ वॉरियर्स इंटरनॅशनल** यांकडे आकर्षित झाले.

मनापासून देवाचे पाचारण स्वीकारल्यानंतर, ४१ वर्ष लाभलेल्या आयुष्यापैकी ३० वर्षांहून अधिक काळ पास्टर म्हणून परमेश्वराची सेवा करण्यासाठी समर्पित केले आणि कधीही सांसारिक सुखसोयींचा शोध घेतला नाही. त्यांनी आपले सेवाकार्य समर्पित अंतःकरणाने पूर्ण केले व तसेच कोणतीही तक्रार न करता शारीरिक कष्ट घेतले.

त्यांना जीवन आणि मृत्यूचे गहन सत्य समजले होते :


***ज्याला मृत्यूचे आकलन होते तो विजेता बनतो.***


***एका खऱ्या विजेत्याला भीती नसते.***

***जे विश्वासाने चालतात त्यांच्यावर मृत्यूचे वर्चस्व नसते.***

अनेक जण जीवनाची फळे उपभोगण्यासाठी जन्माला येतात, परंतु पास्टर ॲलेक्सने भक्ती आणि आत्मत्यागाचा मार्ग निवडला. त्यांच्या स्थिर विश्वासामुळे, देव त्यांना भरपूर आशीर्वाद देईल आणि त्यांना त्याच्या अगदी बाजूला जागा देईल – पृथ्वीवरील आणि स्वर्गातील दैवी न्यायाचे एक प्रमाण.

आपण त्यांच्या स्मृतीचा आदर दुःखाने नाही तर खंबीर अंतःकरणाने करूया. आपण त्यांना देऊ शकणारी सर्वात मोठी श्रद्धांजली म्हणजे **एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजचे** सेवाकार्य दृढ कटिबद्धतेसह चालू ठेवणे, हे जाणून की ते आजही आपल्यासोबत आहेत.


पी. शिवप्रकाशम


सी. मुथू

सद्भावनेने प्रार्थनेसह,
पी. शिवप्रकाशम आणि
सी. मुथू आणि कुटुंब
(पास्टर एस. सॅम सेल्व राज यांचे जवळचे मित्र).

Posted at "Egmore RMS Patrika Channel" RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

## Echo of His Call

**YouTube**
Please subscribe

Kindly view and subscribe our **Echo of His Call YouTube Channel** when you get time. Thanks.

- Editor

## OUR BANK DETAILS:

### 1. Bank : State Bank of India

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

### 2. Bank : ICICI Bank

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : **ICIC 000 6038**

### 3. Bank : State Bank of India

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**
*****
**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-    आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.org

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

**RNI NO. 70106/98**
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/24-26**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS Patrika Channel"**
**on 12th APRIL 2025.**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

## *JESUS LOVES YOU!*

To

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers**, New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**